**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १**
**निशाणी क्र. २४**

**सरतपास शपथेवर पुढे सुरु –**

**सरतपास अर्जदारातर्फे श्री. व्ही. बी. गोरे वकिल साहेब**

१३. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञालेखातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे आणि त्याच्या सत्यतेसाठी मी त्यावर सही केली आहे.

१४. आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत **निशाणी ३७** वर दाखल केलेली आहे. लग्नपत्रिका **निशाणी ३८** वर दाखल केलेली आहे. फौजदारी चौकशी अर्ज क्र.०६/२०२१ आणि म.कौ.हिं.क्र.१०९/२०२१ व नियमित फौजदारी खटला क्र.१७/२०२१ निशाणी क्र.१ ची छायांकित प्रत **आर्टीकल 'अ ते क '** वर दाखल केलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री. वाय. एन. दवंगे वकील साहेब–**

१५. मी इयत्ता आठवी नापास आहे. मला मराठी लिहता वाचता येते. सदर लग्नसंबंधातुन झालेली मुले नामे गौरी व साई हे गैरअर्जदारासोबत राहुन शिक्षण घेत आहे हे म्हणणे खरे आहे. सन २०२३ मध्ये अर्जदार माझ्याकडे नांदण्यासाठी आली होती हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार लग्नानंतर माझ्याकडे नांदण्यास आली त्यावेळी मी तिला दुसरीकडे रोजंदारीसाठी पाठवित होतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारास सदर लग्नसंबंधातुन झालेल्या अपत्यांचा बाळंतपणाचा खर्च तिच्या आई वडीलांने केला हे म्हणणे खरे नाही.

१६. प्रस्तुत अर्ज करण्यापुर्वी गैरअर्जदाराने नांदण्यास यावे म्हणुन हिंदु विवाह अर्ज क्र.६८/२०२१ हिंदु विवाह कायदा कलम ९ नुसार अर्ज दाखल केला होता हे म्हणणे खरे आहे. सदर अर्जात माझ्याविरुध्द हिंदु विवाह कायदा कलम २४ नुसार दरम्यानचे अन्नवस्त्राची रक्कम गैरअर्जदाराला देण्याचा आदेश पारीत करण्यात

आला होता हे म्हणणे खरे आहे. सदर आदेशाप्रमाणे अन्नवस्त्राची रक्कम भरावी लागू नये म्हणुन मी सदरचा अर्ज मागे घेतला होता हे म्हणणे खरे नाही. मी गैरअर्जदारास सतत त्रास देत होतो हे म्हणणे खरे नाही. सन २०२१ मध्ये मी गैरअर्जदारास लोखंडाची उचाटणी तापवुन चटके दिले हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराने माझ्याविरुध्द नियमित फौजदारी खटला क्र.१७/२०२१ दाखल केला आहे हे म्हणणे खरे आहे. सदरचा खटला आज रोजी न्यायालयात प्रलंबित आहे हे म्हणणे खरे आहे. माझ्यात व गैरअर्जदारामध्ये असलेला वाद सामाजिक कार्यकर्ते येवले व दरेकर यांनी मिटविण्याचा प्रयत्न केला होता हे म्हणणे खरे आहे. येवले व दरेकर यांचे त्यावेळी मी ऐकले नव्हते हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न – तुम्ही गैरअर्जदारास चटके दिल्यानंतर तिला दवाखान्यात घेवुन गेले नव्हते?

उत्तर – मी गैरअर्जदारास चटके दिले नव्हते.

१७. गैरअर्जदाराचे माहेर नांदगाव हे कोपरगाव शहरापासुन ७० ते ८० किलोमीटर आहे हे म्हणणे खरे आहे. गैरअर्जदाराचा मी स्वतःहुन त्याग केला आहे हे म्हणणे खरे नाही. मला दुसरे लग्न करावयाचे असल्याने गैरअर्जदारास नांदण्यास घेवुन जात नाही हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार ही माझ्यासोबत नांदण्यास येण्यास तयार आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार ही पत्नीधर्म व्यवस्थीत पार पाडत होती हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न – तुमचे तुमच्या आईवडीलासोबत पटत नसल्यामुळे तुम्ही गैरअर्जदारासोबत वेगळे राहत होता

उत्तर – गैरअर्जदाराचे माझ्या आईवडीलांसोबत पटत नसल्यामुळे मी गैरअर्जदारसोबत वेगळा राहत होतो.

१८. गैरअर्जदारासोबत मी वेगळे राहत असतांना जाणीवपुर्वक तिच्याकडे दोन ते तीन दिवस जात नव्हतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराची अन्नवस्त्राची कोणतीही व्यवस्था मी करीत नव्हतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारा कामानिमीत्त बाहेर गेली असता मी दारास कुलूप लावून चावी माझ्याकडे ठेवत होतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार

स्वतःहुन माहेरी निघून जावे म्हणुन मी तिच्याशी अबोला धरत होतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारासोबत वेगळे राहत असतांना तिने उधारीने आणलेल्या किरणा मालाचे देय मी आजपर्यंत दिलेले नाही हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार ही मला आवडत नाही असे मी तिला वारंवाद म्हणत होतो हे म्हणणे खरे नाही. माझी भावजाई न्यायालयाच्या आदेशाने नांदण्यास आली आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या आईचे माहेर देर्डेकोऱ्हाळे येथील आहे हे म्हणणे खरे आहे. माझी आई व मामा एकाच गावात राहतात हे म्हणणे खरे आहे. नवरा बायको मध्ये कोणत्याही प्रकारचा वाद झाल्यास गावातील व्यक्ती माझी बाजु घेत होते हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारा कुटूंबवत्सल आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारा हिचे वडील मयत झाले आहेत हे म्हणणे खरे आहे. गैरअर्जदार आश्रयात तिचे जीवन जगत आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदार ही नाईलाजास्तव माहेरी राहण्यास भाग पाडले आहे हे म्हणणे खरे नाही.

१९. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापुर्वी गैरअर्जदारास नोटीस देण्यात आली नव्हती हे म्हणणे खरे आहे. गैरअर्जदाराची नांदण्याची ईच्छा आहे किंवा नाही याबाबत मी तिला फोन करुन विचारले नाही हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराचा मी स्वतःहुन त्याग केल्यामुळे ती मानसिक व शारिरीक खचली आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराने माझ्याकडे कधीही फारकतीची मागणी केलेली नाही हे म्हणणे खरे नाही.

२०. मी गैरअर्जदारास नांदण्यास घेवुन जावे म्हणुन तिने माझ्याविरुध्द प्रतिदावा दाखल केलेला आहे हे म्हणणे खरे आहे. माझ्या हट्टामुळे गैरअर्जदाराला नाईलाजास्तव तिच्या माहेरी रहावे लागत आहे हे म्हणणे खरे नाही. मी गैरअर्जदारा सोबत भांडण करुन तिला माहेरी काढुन दिले आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराने नांदण्यास येवु नये म्हणुन मी तिच्याविरुध्द वेगवेगळया प्रकारचे फौजदारी खटले दाखल केले आहे हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारास मी अपमानित करीत होतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारास मी उपाशी पोटी ठेवत होतो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदाराचे पालन पोषणासाठी मी कधीही मनिऑर्डर केलेली नाही हे

म्हणणे खरे आहे. देर्डेकोऱ्हाळे येथे माझे दुकान आहे हे म्हणणे खरे नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचे दुकान माझ्या आजीचे आहे. सदरचे दुकान मी चालवितो हे म्हणणे खरे नाही. गैरअर्जदारानी मला कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न – तुम्ही गैरअर्जदारास नांदण्यास घेवुन जाण्यास तयार आहे का?

उत्तर – मी तिला नांदण्यास घेवुन जाण्यास तयार नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपासणी – नाही.

दिनांक – २३.०७.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.07.23 17:30:15 +0530

(संजय छ. खैरनार)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,कोपरगाव,
जि. अहमदनगर.